No. of Printed Pages : 4

**एफ.एम.टी.-01**

00397

# BDP / BCA / BTS
# मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम

## सत्रांत परीक्षा

## दिसम्बर, 2013

## पाठ्यक्रम कोड : एफ.एम.टी.-01

*समय : 2 घण्टे* *अधिकतम अंक : 50*

---

1. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा : **10**
   (a) प्रजासत्ताक दिनाचे महत्व.
   (b) माझा आवडता कवी.
   (c) नैसर्गिक संपत्तीचे संरक्षण.
   (d) स्त्रियांचे समाजातील स्थान.

2. खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : **8**
   (a) संत तुकारामांनी आपली अनन्य विठ्ठलभक्ती कोणकोणत्या दृष्टान्तांनी स्पष्ट केली आहे?
   (b) कवीला या सृष्टीतून वगळल्यास काय होईल असे केशवसुत सांगतात?
   (c) मर्ढेकरांच्या कवितेमुळे मराठी कवितेत झालेल्या परिवर्तनाची वैशिष्टचे स्पष्ट करा.
   (d) 'कातरवेळ' या कथेच्या आधारे नवकथेची वैशिष्टचे स्पष्ट करा.

3. खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : 6

(a) 'वळीव' कथेत तात्याच्या मनातील विजेची भीती कशी व्यक्त झाली आहे ?

(b) प्रल्हादमुळे पाणी विटाळले असे वाटून पाटलाच्या माणसाने काय केले ?

(c) 'संघर्ष' हा नाट्याचा आत्मा आहे, हे 'सांबर' या एकांकिकेच्या आधारे थोडक्यात स्पष्ट करा.

(d) 'गुंड्याभाऊचे दुखणे' या विनोदी कथेत क्ष-किरणांच्या फोटोवरून निर्माण झालेले विनोद सांगा.

4. खालीलपैकी कोणत्याही **दोन** विषयांवर टीपा लिहा. 6

(a) ललित वाङ्मयाचे अक्षरत्व.

(b) बालगंधर्वांचे भावदर्शन.

(c) लोकशाहीची यशस्विता.

(d) चांगला नागरिक कोण ?

5. (a) उभयान्वयी अव्यय म्हणजे काय ते सोदाहरण सांगा. 2

(b) पुढील शब्दांचे अर्थ सांगून त्यांचा वाक्यात उपयोग करा- 3

(i) भ्रमण (ii) अतर्क्य

(iii) क:पदार्थ

6. खालीलपैकी कोणत्याही **तीन** वाक्प्रचारांचा अर्थ सांगा- 3

(a) तोंड भरून स्तुती करणे.

(b) तोंडाला पाणी सुटणे.

(c) पावले जड होणे.

(d) डोळे पांढरे करणे.

(e) पैसे खाणे.

**किंवा**

खालीलपैकी कोणत्याही तीन म्हणींचा अर्थ स्पष्ट करा :

(a) कोठेही जा, पळसाला पाने तीनच.

(b) राजाला दिवाळी ठाऊकच नाही.

(c) म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावतो.

(d) पांचामुखी परमेश्वर.

(e) आईजीच्या जिवावर बाईजी उदार.

7. खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर लिहा : 4

(a) कायद्याच्या शिक्षणाची गरज का वाटते ?

(b) कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्वावलंबी शिक्षणाचा आग्रह का धरला ?

(c) 'स्त्री-मुक्तीसाठी समाजवादी समाजव्यवस्थेची निर्मिती केली पाहिजे', असे छाया दातार का म्हणतात ?

(d) गणकयंत्रांचा वापर करताना धोक्याचा कोणता कंदिल दाखवला आहे ?

8. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 4

One day Albert Einstein's father brought him a compass. It was a small toy to amuse the child. Albert trembled with excitement as he gazed upon the "magic" needle turning towards the north. He saw before him not a play thing but a miracle. He was too young to understand the principle of magnetism, yet instinctively he felt that he was standing upon the threshold of an enchanted world.

9. खालील उताऱ्याचा सारांश लिहा : 4

प्रसिद्ध तत्ववेत्ता कार्लाइल ह्याने एके ठिकाणी असे म्हटले आहे, की ज्या मनुष्यास आयुष्यात एकदा तरी खळखळून मनसोक्त हसू आले असेल तो मनुष्य अगदी टाकाऊ असणे शक्य नाही. त्याच्यात काही ना काही तरी चांगले गुण असणे शक्य आहे. विनोदाचा गुण असल्याशिवाय मनुष्य, मग तो इतर रीतीने कितीही सद्‌गुणी असो, पूर्णतेला पोचला असे म्हणता यावयाचे नाही. विनोदशीलता हा सुस्वभावाचा सर्वात मुख्य घटक आहे. कारणाशिवाय दुसऱ्यास न दुखविणे, त्यास खुष ठेवण्याचा योग्य प्रयत्न करणे, एक तऱ्हेचा कृपाळूपणा मनात वागविणे, ह्या आपल्या स्वभावगुणांनी विनोदी मनुष्य स्वत:च्या व दुसऱ्याच्या सुखास,आनंदास कारणीभूत होतो.